The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# यादव काळातील सांस्कृतिक साक्षीदार "लीळाचरित्र"

**डॉ. प्रभाकर नारायण क-हाळे**
प्र.प्राचार्य, संतश्रेष्ठ नामदेव महाराज पठाडे कला व विज्ञान महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना :**

यादव कालीन मराठी समाजात व मराठी साहित्यामध्ये महानुभाव संप्रदायाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. तत्कालीन यादव राजे कट्टर सनातनी असल्यामुळे वृत्तवैकल्य, जपतप, उपासतापास, नवसायास, मंत्रतंत्र अशा कर्मकांडांच्या जोखडात सामान्य जनता आडकली होती. महानुभाव संप्रदायाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांनी तत्कालीन समाजाला या धार्मिक जोखडातून मुक्त करून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. महानुभाव पंथीयांनी जाणीवपूर्वक लोक भाषेचा वापर करून खरा भक्तिमार्ग सर्वसामान्यांसाठी खुला केला. महानुभावांनी गद्य व पद्यामध्ये विपूल ग्रंथरचना केलेली आहे.या ग्रंथामधून पंथातील प्रवर्तकांचे चरित्र आणि पंथीय आचार -विचार मांडण्यात आलेले आहेत. या संप्रदायांनी बहुजन लोकांना आपल्या मध्ये सहभागी करून ईश्वरभक्तीचा खरा मार्ग दाखवला. म्हाइंभटासारख्या विद्वानाचा महानुभाव संप्रदायातील प्रवेश आणि त्यांनी केलेले साहित्यिक कार्य फार महान आहे.

यादवकालीन महाराष्ट्रीयन सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने लीळाचरित्र ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आह यादवकालीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा मुख्य आधारच धर्म होता. त्यामुळे लीळाचरित्रासारख्या ग्रंथात धार्मिक आचार विचाराचे प्रतिबिंब उमटलेले दिसते वेगवेगळ्या देव देवता आणि त्यांच्या वेगवेगळ्या उपासना पद्धती यांचे चित्र अनेक वेळांमधून आलेले आहे प्रामुख्याने हळद पुढचा आम्ही नाथ व सोमनाथ लोणारच्या धारातीर्थावरील कुंभेश्वर व वैद्य सदन वाचनीचा गोपाळ बीड येथील दक्षिणेश्वर नांदेडचा नरसिंह व नंदेश्वर पैठणचा भोग नारायण वडनेर चा वटेश्वर रामटेक चा प्रोग्राम आणि रावसगावचा सिद्धांत अशा विविध देवदेवतांचे वर्णन वेगवेगळ्या निळांमधून आलेले आहे

त्याकाळात विविध देवतांची लहान-मोठे देवळे होती. त्या देवळात देवरायांची पुराणे वाचण्यात येत असत.काही देवळातून देवताविषयक नृत्य चालत असे. अजळपूर येथील आंबीनाथाच्या देवळात चक्रधरांनी पुराण श्रवण व नृत्य अवलोकन केल्याचा उल्लेख एका लीळेत आलेला आहे. (लीळा क्र.५३) याच वेळेत स्वामींनी देवास विडा अर्पण केल्याचाही उल्लेख आहे. या देवळात 'गुरव' बडवे असत याचाही निर्देश काही लीळा मधून येतो.(लीळा क्र. २५, ३९,५८) 'सांप्रदायिक पूजा' व 'आगतिक पूजा' असे पूजांचे दोन प्रकार केले जात. काहीतून देवाची त्रिफळ पूजाअर्चा, नैवेद्य वगैरे यथासांग होत असे

तर काही लहान देवळातून नाममात्र पूजा केली जात असे. देवाप्रमाणेच चक्रधरांसारख्या महात्म्यांचीही पूजा भक्त मंडळी करत असे. या दृष्टीने अकराव्या लीळेत एका तेल्याने केलेली त्यांची सांप्रदायिक पूजा आली आहे,तर २१ व्या लीळेत रूपनायकांनी केलेली 'आगमिक' पूजेचा उल्लेख आलेला आहे. तसेच ५७ व्या लीळेत कळजपूरच्या रामदरण्याच्या आईने स्वामींच्या पायावर तुलसी वाहून आपल्या उपासाचे पारणे केल्याचे निर्देश आहेत.त्या काळात जोगी,महात्मे, सिद्ध हे तर गावोगावी असल्याचे दिसतात.

यादव काळात सिद्ध पुरुषांना अनेक प्रकारच्या सिद्धी अवगत असल्याचे काही दाखले लीळाचरित्रात अनेक ठिकाणी पाहावयास मिळतात. उदाहरणार्थ घोडाचुडी नावाच्या सिद्धाच्या शिष्यापाशी हस्तस्पर्शाने आग लावण्याची सिद्धी होती.खुद्द चक्रधरांची गुरुपरंपरा सिद्धीचीच आहे. चक्रधरांना गोविंदप्रभू कडून ज्ञानशक्ती लाभली. त्यांच्याकडे ही 'शेंगळे - बुड्ड्याच्या' रूपानेच स्वतः चक्रधरांच्या ठायीही दुसऱ्याचे मरण चुकविण्याची विद्या होती. असा उल्लेख ३० व्या निळ्या मध्ये आलेला आहे. तसेच ४४ व्या लीळेत आपल्यामुळे 'स्थित्यानंद' लाभलेल्या गोविंदस्वामिने ही गोष्ट स्वतःच्या गुरूस सांगू नये अशी सूचना त्याला देतांना चक्रधरांच्या मनातही हाच अभिप्रेत असावा असे वाटते.सत्पुरुषांचे स्तवन केल्यास शारीरिक दुःख जाईल ही श्रद्धा नीळभट भांडारेकरांसारख्या विद्वानाच्या ठिकाणीही असल्याचे दिसते. एकदा इंगळी डसल्याने असह्य पीडा होऊ लागली. तेव्हा त्यांनी चक्रधर स्वामींना विचारले, 'जी जी: मी स्तुति करू? स्तुति केल्यामुळे इंगळी उतरली. तसेच एखादे अरिष्ट आले असता त्याच्या शमनार्थ 'शांतिक' करण्याची प्रथा होती. हे पन्नासाव्या लीळेवरून कळते.

लीळाचरित्रातून चक्रधर स्वामीच्या आठवणी आलेल्या आहेत. ते स्वतः जनसामान्यात वावरणारे असल्यामुळे त्यांच्या चरित्रातून तत्कालीन समाजजीवनाच्या सांस्कृतिक अंगाचे विस्तृत चित्रण लीळाचरित्रातून आलेले आहे. कारण साहित्य हा समाज जीवनाचा आरसा असतो. समाजातील घटकांचे प्रतिबिंब तत्कालीन साहित्यातून येणे अपरिहार्य आहे. लीळाचरित्र याला अपवाद नाही. यादवकालीन समाजात चतुर्वर्ण्य व्यवस्था होती. उदाहरणार्थ - श्रीचक्रधरांच्या दर्शनाने स्थित्यानंद लाभलेल्या एका चांभाराची ईश्वरपुरुष म्हणून पूजा होत असल्याचे पाहून 'एणे गावो विटाळला' असे त्याच्याच गावचे इतर चांभार ओरड करत असतात.(लीळा क्र.१२) गोविंदप्रभूसारख्या अवतारी पुरुषांनी एका मांगाकडील हुरडा आणि ओलेखाणे लोकांना मान्य होत नाही. स्मशानातील वस्त्रावर तेथे राहणाऱ्या महारांचा हक्क असतो. हे सूचित करणाऱ्या काही लीळा आहेत.

तत्कालीन लोकांचा व्यवसाय 'शेती' असून शेतीला पूरक व्यवसाय म्हणून गुरे सांभाळत असत. त्याचा उल्लेख (३३ व्या)लीळेत आलेला आहे. तर तेल्याचा व्यवसाय करणाऱ्यांचा उल्लेख अकराव्या व अठराव्या लीळेतत येतो. पहिलीतील 'तेल्याकार' आंध्र देशातील असून तो लिंगोपासना करणार आहे.

दुसरीतील तेली स्वतःला 'तीळमारा' तेली म्हणवतो. त्यांच्या बायकांचा उल्लेख 'तिळतेलीण'असा येतो. यावरून तेल्यातही पोटजाती होत्या असे दिसते. 'रांधवणहाट' व त्यातील रांधवणे, म्हणजे खाद्यपदार्थ तयार करून विकणारे हलवाई यांचा निर्देश काही लीळामध्ये आढळतो. 'दूसें' किंवा 'दांडी' उभारून वस्त्रांचा व्यापार करणाऱ्या दुकानदाराचे चित्रण ५६ व्या लीळेत पाहावयास मिळते. तो आपल्या ग्राहकांना 'हातासन' करून म्हणजेच गुप्त रीतीने सांगतो. प्रथम अधिक किंमत सांगून नंतर कमी किमतीला वस्तू देतो. मजुरांना वेठीस धरून कामाला लावण्याची पद्धती होती, असे 'वेठी गमन' सारख्या लीळेवरून कळते.

यादवकालीन समाजात अंधश्रद्धा व भूताखेतांवरील विश्वास अधिक असल्याचे दिसते. उदा.१९व्या लीळेत चक्रधरांनी भूतपिशांच्यादी योनीवरील गोष्टीचा उल्लेख आहे. कोणत्याही मंत्रतंत्राने न मुक्त होणारे भूतपिशाचश्च चक्रधराच्या भेटीने मुक्त होतात. अशी एक कथा आहे वरंगळचा एक धनाढ्य सावकार पुत्रप्राप्तीसाठी चक्रधरांनी 'पाचां सहस्त्रांची पूजा करतो' (१५ वी लीळा) तर एक ठाकूर याच इच्छेने स्वतःची बायको चक्रधरांकडे त्यांची सेवा करण्यासाठी पाठवतो. (४२वी लीळा) एकदा चक्रधर स्वामींना उकिरड्यात पडून राहण्याची लहर येते व काही वेळाने त्यांना तेथून बाहेर पडताना पाहून 'अरे: उकरडा व्याला: माणूस जालें: हे गावां अरिष्ट जालें: आता शांति करा' असे गावाचे लोक म्हणू लागतात. इतकेच नव्हे तर आरिष्टांच्या शमनार्थ 'खीचपुरियांचा' स्वयंपाक करून वैराग्यांना जेवू घालतात. वरील सर्व गोष्टी तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा सुचवितात.

महाराष्ट्रीयन समाज सण-उत्सवप्रिय समाज आहे. सामाजिक समारंभ, चालीरीती आदींचा उल्लेख लीळाचरित्रातील अनेक लीळांमधून दिसून येतो. यातून यादवकालीन महाराष्ट्राच्या विविध अंगी संस्कृतीचे दर्शन घडते.जन्माला येण्याआधी पासून ते मृत्यूपर्यंत व नंतरही केले जाणारे संस्कार यादवकालीन महाराष्ट्रात जोपासत असल्याचे दिसते. डोहाळ जेवण,उद्यापन करणारा श्रीमंत मल्ल पुत्रप्राप्तीपित्यर्थ पाच सहस्रांचा जोगवटा गोसाव्यांना अर्पण करून मनोरथ सिद्धीचे नवस फेडतो. पुत्र जन्म, त्याचे बारसे, उष्टावन, विवाहापूर्वी नियोजित वरास गोत्रकुटुंबीयांनी पाहणे, वरशोधार्थ पायी कापड बांधून फिरणारा वधू पिता,जाती कुळ बघण्याची रीत, गोंधळ करणे, वऱ्हाडी,त्यांचा पाहुणचार, मानपान, मांडव, सेवंत मूळ पाठवणे, आहेराची देवाणघेवाण, पाठवणी देणे इत्यादी विवाहासंदर्भातील विविध लोकरुढीचे वर्णन लीळाचरित्रात आलेले आहे.यावरून यादवकालीन समाजाच्या विविध चालीरीती,रूढी, परंपरा त्याकाळात प्रचलित होत्या, हे दिसून येते. 'सेस भरणे' म्हणजे कपाळी मळवट भरणे, हे सौभाग्याचे मानले जाई. त्याचप्रमाणे हरिपाळदेव जिवंत झाल्यावर त्यांची बायको कमळाइसे हिची सेस भरली जाते असा उल्लेख पाचव्या लीळेत आहे. चालीरीतीचा विचार करता पित्याच्या मृत्यूनंतर त्याच्या पुत्रांने क्षौर करणे व 'वैदिक' म्हणजे सूतक पाळून शिवाशिव न करणे अशा

चालीरीतीचा उल्लेख आढळतो. मोठ्या माणसाच्या भेटीच्या वेळी काही भेट वस्तू किंवा नजरांना देण्याची रीत प्रचलित होती. (लीळा क्र.२५)

यादवकालीन समाजातील खाद्यपदार्थांचा उल्लेख काही लीळामधून येतो. जसे- जेवणासाठी ताट, केळीची पान यावरून 'ताट करणे' व 'ठाय करणे 'असे वाक्प्रचार ही रूढ झालेले दिसतात.( वरिलीकडे ताटे गोसावीयासी केले: खालिलीकडे ठाए एरांशी केले) लीळा ४६. खाद्यपदार्थ ताकभात, दहीभात, पाणीभात , वरण-भात, आंबील, बाभूळशेंगा इत्यादीचा निर्देश आहे. मुखशुद्धीसाठी भोजनानंतर 'फोडी म्हणजेच सुपारीची खांडे किंवा पानाचा विडा देण्याची पद्धत असल्याचा उल्लेख सापडतो.

यादवकालीन मानवी स्वभावाचे वर्णन काही लीळेतून आढळते.एक गवळी आपली गुरे दुसऱ्या गावच्या शिवारात दडपून चारी.त्यासाठी त्या लोकांना लाच देत असे. त्याकाळी स्त्री स्वतंत्र नव्हती. भांडाऱ्याचे निळभट गृहत्याग करून चक्रधराच्या मागे निघाले तेव्हा त्यांच्या बायकोने त्यांना एकदा विचारले; परंतु त्यांचा जाण्याचा निर्धार पाहून ती बिचारी निमुटपणे मागे राहिली, हा प्रसंग सांगताना चक्रधरांनी मोठ्या मार्मिकपणे 'अज्ञाधरे: मग तिथें राहिली' असे म्हटले.

तत्कालीन घरे माळवधी असून त्याला उपरी म्हणजे ओसरी व पडवी असे दोन भाग होते. विरक्त पुरुष गुंफा म्हणजे झोपडी बांधून राहत असत. गावात देवळे असत त्याच्या आजूबाजूला 'पोखरणी' म्हणजे तळे असल्याचा उल्लेख सापडतो. शिक्षण हे संस्कृतीचे एक महत्त्वाचे अंग आहे. नांदेड येथील पडशाळेत शिकत असलेल्या मुलांच्या उल्लेखावरून लक्षात येते. एक संन्याशी दुसऱ्या संन्याशाशी 'उघाणी' म्हणजे वाद करत असत. त्यात हरणाऱ्या संन्याशाला आपल्या मठास, पोथ्या- पुस्तकास किंवा मळा इत्यादी संपत्ती मुकावे लागे. अशा काही प्रथा त्यावेळी अस्तित्वात होत्या. याशिवाय वेगवेगळ्या कला जसे - चुना तयार करणे, रंग तयार करणे, जीवन उपयोगी हत्याराची निर्मिती कला, वस्त्र प्रकारात- दुटी, पाटाड वोलीसाडला, त्रिवडी, जाडी, दुणीची अंगी आणि टोपरे इत्यादीचा उल्लेख आहे. पायात घालण्यासाठी वहाणा, कंदील, पायपुसणे तयार करण्याचे प्रशिक्षण देण्याची कला याचा उल्लेख लीळामधून येतो.

याशिवाय मनोरंजनाच्या वेगवेगळ्या क्रीडादि प्रकारांचा उल्लेख लीळाचरित्रातून आलेला आहे. जुगार, त्यांची विशिष्ट नीती, गुराख्यांचा 'रानभेरीचा' खेळ, पारध्यांचा 'होडे'चा क्रिडा प्रकार इत्यादी. म्हाइंभटांनी लिहिलेल्या लीळाचरित्रामधून यादवकालीन बोलीभाषेचे स्वरूप यथार्थपणे व्यक्त झालेले दिसून येते. एकंदरीत लीळाचरित्राची भाषा साधी, सोपी व सरळ असून त्यात तत्कालीन समाजाचे सौंदर्य एकवटलेले आहे.स्वामी 'म-हाटी अनावर बोलताति' अशी चक्रधरांची कीर्ती होती. उदाहरणार्थ - चक्रधर आणि इतरेजन यांना मिळालेल्या पाहुणचाराची काही वर्णने पुढीलप्रमाणे - "गोसावीयासि

मर्दना मादने: सांगाती उटीला न्हाणिला: गोसावीयासि आरोगणा: सांगतीया जेवण जाले: गोसावी पहूड सांगाती निजैला." (लीळा ३६)

**समारोप**

लीळाचरित्राचे कर्ते म्हाइंमभट हे अत्यंत अभ्यासू असल्यामुळे त्यांनी अत्यंत कष्टपूर्वक स्वामींच्या लीळा संकलित करून चरित्र लेखन केले आहे. स्वामी हे समाजातील जनसामान्यात वावरत असल्याने त्यांच्या चरित्रातून तत्कालीन समाजातील सामाजिक,धार्मिक, सांस्कृतिक जीवनाचे चित्रण अत्यंत सूक्ष्मपणे आलेली आहे. म्हणूनच लीळाचरित्र हा ग्रंथ यादव काळातील सांस्कृतिक जीवनाचा साक्षीदार ठरतो.

**निष्कर्ष :**

१. यादवकालीन समाज मनावर धर्माचा जबरदस्त पगडा होता.

२. वेगवेगळ्या अनिष्ट रूढी - प्रथा, परंपरा यामुळे समाज पोखरला गेला होता.

३. श्री चक्रधर स्वामींनी तत्कालीन समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही मूल्यांची शिकवण दिली.

४. श्री चक्रधर स्वामींनी लोकांना ईश्वर भक्तीचा खरा मार्ग दाखवला.

५. लीळाचरित्रातून यादवकालीन समाज जीवनाचे वास्तव चित्रण आलेले आहे, म्हणून 'लीळाचरित्र' हा ग्रंथ यादव कालीन सांस्कृतिचा साक्षीदार ठरतो.

६. लीळाचरित्रातून यादवकालीन मराठी गद्याचे आकलन होते.

**संदर्भ ग्रंथ :**

१. संपा.डॉ. वि.भि. कोलते,लीळाचरित्र

२. डॉ. शं.गो. तुळपुळे महानुभाव पंथ व त्यांचे वाड्.मय

३. डॉ. सदाशिव सरकटे ,डॉ. सुशीला सोलापूरे, मध्ययुगीन मराठी वाड्.मयाचा इतिहास.

४. प्रा.नरेंद्र मारवाडे, प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास.

५. ह.श्री.शेणोलीकर, प्राचीन मराठी वाड्.मयाचे स्वरूप.

**यादव काळातील सांस्कृतिक साक्षीदार "लीळाचरित्र"**

**डॉ. प्रभाकर नारायण क-हाळे**